# सहसंचालक तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती

**शासकीय तंत्र निकेतन परीसर, गाडगेनगर अमरावती**

Email:-roamravati@dtemaharashtra.gov.in internet-http://www.jdroamt.org

Phone:- ०७२१-२५७३०२७, २५७२५७७ Fax No.-०७२१-२६६१४५३


क्र. विकाअ/लेखा/वृक्षलागवड/२०१७/ 1153

दि. 12 MAY 2017

प्रति,

**प्राचार्य**
**विभागातील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित**
**अभियांत्रिकी/औ.नि.शास्त्र पदवि/पदविका संस्था**

विषयः- **१ जूलै २०१७ रोजी राज्यात किमान ३ कोटी वृक्ष लागवड अभियान कार्यक्रम राबविण्याबाबत.**

संदर्भः- **१. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/लेखा/वृक्षलागवड/२०१६/३५०७ दि.१७.११.२०१६**
**२. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/लेखा/वृक्षलागवड/२०१६/३७४० दि.१४.१२.२०१६**
**३. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/लेखा/वृक्षलागवड/२०१७/४२८ दि. २६.२.२०१७**
**४. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/लेखा/वृक्षलागवड/२०१७/७०८ दि. २२.३.२०१७**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, या कार्यालयाचे संदर्भ क्र. १ चे पत्रान्वये सन २०१७ चे पावसाळयात आपले संस्थेत करावयाचे वृक्ष लागवडीचे उदिष्ट आपणास कळविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने १ जूलै २०१७ रोजी आपले संस्थेचे परिसरात करावयाचे वृक्षलागवडी करीता खोदण्यात आलेल्या खडडयांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती तसेच उपवनसरंक्षक, अमरावती यांचे कार्यालयास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजीत बैठकीमध्ये सुचीत करण्यात आलेले आहे. करीता आपले संस्थेचे परिसरात **वृक्षलागवडी करीता खोदण्यात आलेल्या खडडयांची माहिती** त्वरीत या कार्यालयास उलट टपाली इमेलव्दारे सादर करावी जेणे करुन विभागाची एकत्रित माहिती उपवनसंरक्षक अमरावती/जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना सादर करता येईल.

तसेच **सन २०१६ चे पावसाळयात दि. १ जुलै २०१६** रोजी आपले संस्थेचे परिसरात केलेल्या वृक्षलागवडीतील जिवंत असलेल्या रोपांची संख्या व टक्केवारीची माहिती सादर करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भ क्र. ३ व ४ चे पत्रान्वये आपणास कळविण्यात आलेले आहे. तथापी, अदयापपर्यत माहिती सादर करण्यात आलेली नाही. सदरहू माहिती उपसंचालक सामाजिक वनिकरण यांना त्वरीत सादर करावयाची असल्यामुळे उलट टपाली/इमेलव्दारे या कार्यालयास त्वरीत सादर करावी.

(डॉ. डी.एन.शिंगाडे )
प्र.सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय
अमरावती

**प्रतिलिपी:-** संगणक प्रोग्रामर, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती यांना आवश्यक कार्यवाहीकरीता.